# राष्ट्रवादीचा मुस्लिम उमेदवार नावापुढे 'भावी महापौर' लावून करतोय प्रचार!



डॉ. अनिल बोंडेंचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.९ )** - शहरात एकीकडे महिन्याला चार हत्या होत आहेत, एमडी ड्रग्ज, गुटखा, गांजा तस्करी मोठ्या प्रमाणात आहे. शहराच्या ज्या भागातून ही तस्करी चालतो, आणि जे लोक हे धंदे चालवितात तेच लोक आज घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवित आहेत. इतकेच नाही तर ते आपल्या नावासमोर 'भावी महापौर' लावून प्रचार करित आहे. गुंडगिरीतील मुस्लिम उमेदवार हा महापौर बनवायचा आहे, असा आरोप पुन्हा एकदा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी शुक्रवारी केला. हॉटेल महफील येथे आयोजित एका पत्रकार परिषदेनंतर डॉ.अनिल बोंडे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना त्यांनी ही माहिती दिली. यापुर्वी डॉ.अनिल बोंडे यांनी आयोजित एका सभेच्या मंच वरुन भाषण देत असताना राष्ट्वादी काँग्रेसला मुस्लिम महापौर म्हणजेच राष्ट्वादी काँग्रेस(अजित पवार गट) बनवायचा असल्याचे सांगितले होते

# दहा बाय दहा चा खड्डा, गिट्टीचा ढीग आणि फलक इतकाच आ.खोडकेंचा विकास

## ईव्हीएम मधून व्यक्त होणार नागरिकांचा संताप

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.९ )** - महापालिका निवडणूकीच्या तोंडावर आमदार सुलभा खोडकेंकडून शहरातील लोकवस्त्यांमध्ये वाटण्यात आलेल्या भूमिपूजन फलकाच्या 'लॉलीपॉप' पासून नागरिक चांगलेच दुखावलेले दिसत आहे. गेले पाच वर्ष विकास न करता फक्त निवडणूकीच्या तोंडावर विकासाच्या नावावर दहा बाय दहा चा खड्डा, गिट्टीचा ढीग आणि भूमिपूजनाचे फलक इतकेच विविध प्रभागात पहायला मिळत आहे.

राष्ट्वादी काँग्रेस ने महापालिका निवडणूकीमध्ये संपुर्ण 27 प्रभागांमध्ये 87



उमेदवार रिंगणात उतरविले आहे. अतिआत्मविश्वासाने हे 87 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरविले असल्याचे दिसत आहे. कारण विकासाच्या नावावर नागरिकांच्या तोंडाला पाने पुसायची, आणि संपुर्ण 87 जागा निवडूण आणण्याचे स्वप्न पहायचे, हा प्रकार सध्यास्थितीला शहरात पहायला मिळत आहे. वाट्टेल त्याला उमेदवारी देवून राष्ट्वादी काँग्रेस ने एकप्रकारे शहरातील नागरिकांशी जुगार खेळला आहे. त्यामूळे भूमिपूजनाच्या फलका च्या भरवश्यावर खोडके दाम्पत्य किती जागा मिळवतील हे येत्या 16 तारखेला स्पष्ट होईल.

# दर्यापूर-अकोट मार्गावर भीषण अपघात

## गुरुकुल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बालासुब्रमण्यम नचिमुथू यांचा जागीच मृत्यू







**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि. 9 )** - दर्यापूर-अकोट मार्गावरील माहेश्वरी भवन परिसरात आज शुक्रवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात गुरुकुल बीएससी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बालासुब्रमण्यम नचिमुथू (रा. तामिळनाडू) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे दर्यापूरसह संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राचार्य डॉ. नचिमुथू हे शुक्रवारी सकाळी सुमारे 11.30 वाजताच्या सुमारास आपल्या दुचाकी (बुलेट) क्रमांक टीएन 38 सीपी 5316 ने काही कामानिमित्त दर्यापूर-अकोट



मार्गाने जात होते. माहेश्वरी भवनाजवळ त्यांच्या दुचाकीची समोरून जाणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच 49 बीझेड 1225 च्या मागील भागाला जोरदार धडक बसली. या अपघातात डॉ. नचिमुथू गंभीर जखमी झाले असून घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.

दर्यापूर-अकोट हा मार्ग आधीपासूनच वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत वर्दळीचा आणि अपघातप्रवण असल्याचे ओळखले जाते. याच ठिकाणी यापूर्वीही अनेक गंभीर अपघात घडले आहेत. मात्र, वारंवार अपघात होऊनही वाहतूक नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना करण्यात येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पोलीस प्रशासन व संबंधित यंत्रणांनी या मार्गावरील वाहतूक व्यवस्थेकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे. या दुर्दैवी घटनेनंतर गुरुकुल बीएससी नर्सिंग कॉलेजमधील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. प्राचार्य डॉ. नचिमुथू यांचे पार्थिव पाहण्यासाठी रुग्णालयात मोठी गर्दी झाली होती. कर्तव्यदक्ष, अभ्यासू आणि शिस्तप्रिय प्राचार्य म्हणून त्यांची ओळख होती.

### अपघातग्रस्त दर्यापूर-अकोट महामार्गावर प्रशासनाची उदासीनता

दर्यापूर-अकोट हा महामार्ग अपघातग्रस्त रस्ता म्हणून आधीपासूनच ओळखला जातो. याच परिसरात वारंवार अपघात होऊनही वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आणखी किती निष्पाप जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# वरुड, लोणीत नॉयलॉन मांजाविरोधात धडक कारवाई

**विक्री, साठवणूक व वापरावर पूर्ण बंदी**

**कडक अमंलबजावणीला सुरुवात**



### अडीच लाखांचा दंड

या आदेशानुसार नॉयलॉन मांजा साठवणूक किंवा विक्री करताना आढळून आल्यास संबंधितावर रु. 2,50,000 दंड, तर वापर करताना मिळून आल्यास रु. 50,000 दंड ठोठावण्याची तरतूद प्रस्तावित आहे. अमरावती ग्रामीण घटकात कुठेही नॉयलॉन मांजाची विक्री, साठवणूक अथवा वापर होणार नाही, याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सर्व अधिनस्थ प्रभारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** - नॉयलॉन व सिंथेटिक मांजामुळे होणाऱ्या गंभीर अपघातांची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने नॉयलॉन मांजाची विक्री, साठवणूक तसेच वापर यावर पूर्णतः प्रतिबंध घालण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

8 जानेवारी 2026 रोजी पोलीस स्टेशन लोणी हद्दीत मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई करत आरोपी मनोहर गोविंदराव ढेंबरे, रा. लोणी यास नॉयलॉन मांजाचा वापर करून पतंग उडवित असताना रंगेहाथ पकडण्यात आले.

नॉयलॉन मांजाचा वापर नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करू शकतो, याची जाणीव असूनही त्याचा वापर केल्याने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन लोणी येथे भारतीय न्याय संहितेच्या विविध गंभीर कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वरूड येथे नॉयलॉन मांजा विक्रीवर छापा

याच दिवशी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन वरूड हद्दीत गस्त घालत असताना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार बंगला चौक, वरूड येथील शे. कदीर शे. बशीर, रा. वरूड याच्या दुकानावर छापा टाकण्यात आला. झडतीदरम्यान त्याच्या ताब्यातून विक्रीसाठी साठवून ठेवलेला प्रतिबंधित नॉयलॉन/सिंथेटिक मांजा एकूण 51 रिल्स (बंडल), किंमत सुमारे रु. 2,300 जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन वरूड येथे भा. न्या. सं.च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सत्र न्यायालयात चालणारे गंभीर गुन्हे**

पतंग उडविण्यासाठी नॉयलॉन/सिंथेटिक मांजाचा वापर, साठवणूक किंवा विक्री केल्यास गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदविला जात असून अशी प्रकरणे सत्र न्यायालयातच चालविली जातात. त्यामुळे कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी तसेच पालकांनी आपल्या पाल्यांना नॉयलॉन/सिंथेटिक मांजाचा वापर करू नये, याबाबत योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# विद्युत नगरमध्ये दिवसाढवळ्या घरफोडी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** - दिवसाढवळ्या घरातच चोरी करून सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विद्युत नगर कॉलनीत समोर आली असून, या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विद्युत नगर येथे वास्तव्यास असलेल्या प्रमोद माणिकराव मळसने (वय 65) यांच्या घरात ही चोरी झाली. त्यांच्या मुलीने आपल्या खोलीत ठेवलेले सोन्याचे दागिने दि. 7 जानेवारी रोजी दुपारी सुमारे 3 वाजताच्या सुमारास गायब झाल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी शोध घेतला. मात्र दागिने आढळून न आल्याने चोरी झाल्याची खात्री झाली. चोरट्याने घरातून 4.13 ग्रॅम वजनाचे सोन्याचे गोप, दोन सोन्याच्या अंगठ्या तसेच 13 ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकेट असा एकूण 1,35,564 किमतीचा मौल्यवान ऐवज चोरून नेल्याचे निष्पन्न झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच प्रमोद मळसने यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, त्यावरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# दागिने व रोख रकमेची चोरी


**अमरावती** - बुधवारी रात्री उशिरा नांदगावपेठ पोलीस स्टेशन हद्दीतील महालक्ष्मी नगर परिसरात चोरट्यांनी बंद घर फोडून सोन्याचे टॉप्स, चांदीचे कानातले, पायल, चांदीचे चमचे तसेच 20 हजार 500 रोख रक्कम लंपास केली. या प्रकरणी संजय गणेश ठाकरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नांदगावपेठ पोलीस करीत आहेत.

# शेती अवजारे चोरीप्रकरणी सराईत चोर अटकेत

## कुऱ्हा पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** - शेतीसाठी वापरण्यात येणारी अवजारे तसेच इतर साहित्य चोरी करणाऱ्या एका सराईत चोराला कुऱ्हा पोलिसांनी अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे. गजानन फकीरा मोहिते (वय 30, रा. बागापूर, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



जिल्ह्यात वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सर्व पोलीस ठाण्यांना सतर्क राहून कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर 9 जानेवारी 2026 रोजी कुऱ्हा पोलिसांनी ही यशस्वी कारवाई केली. कुऱ्हा ते चांदूर रेल्वे मार्गावर पेट्रोलिंग करत असताना अपर वर्धा नदीजवळील पडीत क्वार्टर परिसरात एक व्यक्ती अ?ॅक्टिव्हा (क्रमांक एमएच 40 बीएस 9148) घेऊन संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आली. पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली असता त्याच्याकडे वाहनाची कागदपत्रे नसल्याचे निष्पन्न झाले. अंगझडती घेतली असता त्याच्याकडून वायर कटर सापडल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला. यानंतर त्याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता, आरोपीने वागदा, अमदुरी, भिवापूर आणि व-हा शिवार या परिसरातून मोटार पंप व विद्युत वायर चोरी केल्याची कबुली दिली.

चोरी केलेला माल त्याने भंगार व्यावसायिकांना विकल्याचेही तपासात उघड झाले. पोलिसांनी संबंधित भंगार व्यावसायिकांकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केला असून, त्यामध्ये चार पाणबुडी मोटारी (32,000), पाच किलो तांब्यासदृश तार (5,000) आणि सहा नोझल (5,000) असा एकूण 42,000 किमतीचा मुद्देमाल समाविष्ट आहे. या तपासातून आरोपीशी संबंधित चार चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. अनुप वाकडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. दरम्यान, ठाणेदार डॉ. अनुप वाकडे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाली दिसून आल्यास तात्काळ कुऱ्हा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

# महापालिका निवडणूक : 805 मतदान केंद्रांवर खाकीचा कडेकोट बंदोबस्त

## कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस आयुक्त राकेश ओला थेट मैदानात







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.९ )** - अमरावती महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. संभाव्य तणाव, राजकीय वाद तसेच असामाजिक कारवाया रोखण्यासाठी पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी स्वत: सूत्रे हाती घेतली असून, संपूर्ण शहरावर करडी नजर ठेवली जात आहे.

यंदा प्रथमच निवडणूक सुरक्षेच्या नियोजनात महत्त्वाचा बदल करत शहरातील तीनही विभागांच्या सहायक पोलिस आयुक्तांना थेट जबाबदारी देण्यात आली आहे. पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार संबंधित एसीपी दोन दिवसांत त्यांच्या-त्यांच्या हद्दीतील सविस्तर सुरक्षा अहवाल सादर करणार आहेत. या अहवालांमध्ये मतदान केंद्रांची संवेदनशीलता, मागील निवडणुकांतील वादग्रस्त घटना, स्थानिक गुन्हेगारी पार्श्वभूमी, राजकीय प्रतिस्पर्धा तसेच सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. या आधारे संपूर्ण शहरासाठी एकत्रित आणि प्रभावी असा अंतिम सुरक्षा आराखडा तयार करण्यात येणार आहे.

प्रचाराच्या काळात तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलिस बंदोबस्त, क्यूआरटी पथके आणि राखीव दल तैनात करण्यात येणार आहे. तसेच शहरात पायी व वाहन गस्त वाढवून संशयास्पद हालचालींवर तात्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

### निवडणूक आकडेवारी

एकूण मतदान केंद्रे : 805
पोलिस ठाणे हद्दी : 10
उमेदवारांची संख्या : 661

### शहर तीन विभागांत विभाजित

**राजापेठ विभाग :** प्रभारी एसीपी संजय खताळे (राजापेठ, कोतवाली, खोलापुरी गेट, भातकुली)

**फ्रेजरपुरा विभाग :** एसीपी कैलास पुंडकर (फ्रेजरपुरा, बडनेरा, नांदगावपेठ)

**गाडगेनगर विभाग :** प्रभारी एसीपी शिवाजी बचाटे (गाडगेनगर, वलगाव, नागपुरी गेट)

### कडक सुरक्षा उपाय

मतदानापूर्वी तीन दिवसांपासून विधानसभा निवडणुकीच्या धर्तीवर कडक सुरक्षा बंदोबस्त लागू केला जाणार असल्याचे पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी स्पष्ट केले आहे. शांततापूर्ण व निर्भय वातावरणात मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# उदखेड येथे खनिज वाहतूक करणाऱ्या डंपरने वृद्धाला चिरडले

## रिव्हर्स घेताना अपघात; 75 वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू, चालक फरार

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि. 9 )** - मोर्शी-चांदूरबाजार मार्गावरील उदखेड येथे खनिज वाहतूक करणाऱ्या डंपरच्या धडकेत 75 वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज शुक्रवारी, 9 जानेवारी रोजी दुपारी सुमारे 3 वाजताच्या सुमारास घडली. या घटनेनंतर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृतकाचे नाव हरिभाऊ मोतीरामजी ठाकरे (वय 75), रा. उदखेड असे आहे. हरिभाऊ ठाकरे हे एसटी बस थांब्यापासून आपल्या घरी जात असताना, उदखेड गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खनिज वाहतूक करणारा डंपर (क्रमांक एम.एच. 27 बी.झेड. 7171) चालकाने रिव्हर्स घेतला. यावेळी चालकाच्या निष्काळजीपणामुळे वृद्ध ट्रकच्या चाकाखाली सापडले. या भीषण अपघातात हरिभाऊ ठाकरे यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर डंपर चालकाने घटनास्थळावरून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ जमा झाले. ग्रामस्थांनी खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या बेदरकार वाहतुकीबाबत तीव्र संताप व्यक्त केला. गावातून जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे नागरिकांच्या जीवाला सातत्याने धोका निर्माण होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच मोर्शी पोलीस स्टेशनचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नांदगावकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे पाठविण्यात आले. या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी संबंधित डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, अपघातानंतर फरार झालेल्या चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.



# व्हीबी-जी आरएएम-जी विधेयक ; गांधीजींच्या विचारधारेशी सुसंगत, रामराज्याची संकल्पना

## संयोजक डॉ.अनिल बोंडे यांची पत्रकार परिषद

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.9 ) –** ‘विकसित भारत 2047’ या राष्ट्रीय दृष्टीकोनाशी सुसंगत ग्रामीण विकासाचा नवा आराखडा उभारण्यासाठी व्हीबी-जी आरएएम-जी विधेयक ( ग्रामीण रोजगार हमी ) सादर करण्यात आले आहे. प्रत्येक गरीब व गरजू नागरिकाला रोजगाराची संधी मिळावी, श्रमाची प्रतिष्ठा जपली जावी तसेच आदिवासी व मागास घटकांचा सर्वांगीण विकास साधावा, हा या विधेयकाचा प्रमुख उद्देश आहे. महात्मा गांधींच्या विचारधारेशी सुसंगत आणि रामराज्याच्या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन हे विधेयक आणण्यात आले असल्याची माहिती योजनेचे महाराष्ट्राचे संयोजक खा.डॉ.अनिल बोंडे यांनी शुक्रवारी एका पत्रकार परिषदेतून दिली.




डॉ. बोंडे यांनी सांगितले की, या योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दरवर्षी 125 दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली असून, वनक्षेत्रात काम करणाऱ्या अनुसूचित जमातींच्या कामगारांना अतिरिक्त 25 दिवसांचा रोजगार देण्याची तरतूद आहे. नव्या योजनेत कामाचे दिवस वाढविण्यात आले असून मजुरी दर आठवड्याला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ग्रामीण रोजगार हमी योजनेत मजुरी पंधरा दिवसांनी दिली जात होती. ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आतापर्यंत 11.74 लाख कोटी रुपयांचा खर्च झाला असून, त्यातील 8.53 लाख कोटी रुपयांचा खर्च विद्यमान सरकारच्या काळात करण्यात आला आहे. यावरून ग्रामीण विकासाबाबत सरकारची कटिबद्धता स्पष्ट होते. नव्या कायद्यानुसार प्रत्यक्ष वेळेत माहिती नोंद, जागतिक स्थाननिर्धारण प्रणाली, भ्रमणध्वनी निरीक्षण तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित गैरव्यवहार शोध प्रणाली लागू केली जाणार आहे. जलसंधारणाची कामे, ग्रामीण पायाभूत सुविधा, आजीविका निर्माण करणारी साधने आणि हवामान बदलामुळे होणारा रोजगारातील खंड कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे शेती, बाजारपेठ, साठवणूक आणि ग्रामीण उत्पन्नात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे बोंडे यावेळी म्हणाले.

# जिल्हा परिषदेच्या शाळा बंद तर गरिबांच्या शिक्षणाचं काय?

## खाजगीकरणाची भीती, पालकांमध्ये अस्वस्थता



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.9 ) –** राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याच्या चर्चेमुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये तीव्र चिंता निर्माण झाली आहे. शाळाच बंद झाल्या तर आमची मुलं शिकणार कुठे? असा सवाल आज सर्वसामान्य पालकांकडून उपस्थित केला जात आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क असताना सरकारी शाळांचे अस्तित्वच धोक्यात येत असल्याची भावना समाजात बळावत आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळा या केवळ इमारती नसून गरिबांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे उघडणारी आशेची शेवटचा किरण आहे. खासगी शाळांचे वाढते शुल्क, वह्या-पुस्तकांचा खर्च, गणवेश व इतर शुल्क सर्वसामान्य शेतकरी, मजूर व कष्टकरी कुटुंबांना परवडणारे नाहीत. अशा परिस्थितीत खाजगीकरण झाले तर शिक्षण श्रीमंतांच्या मक्त्यात जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे.



प्रणित कुबडे,
सामाजिक कार्यकर्ते

ग्रामीण भागात शाळा बंद झाल्यास मुलांना दूरच्या गावात जावे लागेल. याचा सर्वाधिक फटका मुलींच्या शिक्षणाला बसण्याची शक्यता आहे. सुरक्षितता, प्रवासाचा खर्च व वेळ यामुळे अनेक पालक मुलींचे शिक्षण अर्धवट सोडण्याचा निर्णय घेतील, ही चिंताजनक बाब आहे. शिक्षणतज्ज्ञांच्या मते शाळा बंद करणे हा उपाय नसून शाळांची गुणवत्ता वाढवणे, शिक्षकांची पदे भरणे, आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि प्रोत्साहन योजना राबवणे आवश्यक आहे. आजचा प्रश्न केवळ शाळांचा नसून उद्याच्या पिढीच्या भविष्याचा आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळा सक्षम करण्याचा मार्ग स्वीकारावा, अशी मागणी होत आहे. शिक्षण हा खर्च नसून देशाच्या भविष्यावरील गुंतवणूक आहे, अशी अपेक्षा प्रणित कुबडे यांनी व्यक्त केली आहे. कार्यकर्ते

# बचपन इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये ‘स्पोर्ट्स ऑलिम्पियाड’चा जल्लोष

## शिस्त, संघभावना आणि क्रीडावृत्तीचे उत्तम दर्शन

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.9 ) –** येथील बचपन इंटरनॅशनल पब्लिक स्कूल येथे नुकतेच ‘स्पोर्ट्स ऑलिम्पियाड’चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक पप्पू उर्फ निलेश भालेराव होते. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार विवेक राऊत, बंडू आठवले, शहेजाद खान व व्यंकटेश गणेडीवाल उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेली शिस्तबद्ध परेड, टॉर्चलाइट शो आणि आकर्षक ब्राझिलियन नृत्याने कार्यक्रमात रंगत आणली. त्यानंतर विविध क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मानसिक व शारीरिक क्षमतेचा कस लावत आत्मविश्वास, क्रीडावृत्ती आणि संघभावनेचे प्रभावी प्रदर्शन केले. खेळाडू वृत्ती, सहकार्य व सांघिक कार्य यांचे उत्कृष्ट उदाहरण विद्यार्थ्यांनी समाजासमोर ठेवले.



प्रास्ताविकात शाळेच्या संचालिका मीनाक्षी रॉय यांनी खेळ हे केवळ विजय-पराभवापुरते मर्यादित नसून शिस्त, सहकार्य व कठोर परिश्रम यांसारखी जीवनमूल्ये घडविणारे माध्यम असल्याचे सांगितले. यावेळी मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता बक्षीस वितरणाने झाली. संचालन वैष्णवी लाटेकर व अनुष्का गुजर यांनी केले, तर मुख्याध्यापिका श्रुती खांजोडे यांनी आभार मानले.



# माहुली चोर येथे रक्तदान शिबिर

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर,( दि.9 ) –** शिवशक्ती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, माहुली चोर व क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले ब्लड डोनर ग्रुप, अमरावती (विदर्भ, महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने माहुली चोर येथे नुकतेच रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. आरोग्य विभागात सातत्याने भासणारा रक्ताचा तुटवडा लक्षात घेता रुग्णालयांमध्ये रक्ताची कमतरता भासू नये, या उद्देशाने या छोटेखानी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मराठी पौष महिना सुरू असल्याने ग्रामीण भागात श्रीमद्भागवत कथा, जत्रा व महाप्रसादांचे आयोजन मोठ्या प्रमाणात होत असते. अशा धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या निमित्ताने तरुणांनी नियोजनपूर्वक रक्तदान शिबिरे आयोजित करावीत, जेणेकरून रुग्णसेवेला हातभार लागेल, असे आवाहन मनोज गावंडे यांनी यावेळी केले. या शिबिरात रोशन चोरे, अक्षय पवार, प्रफुल्ल वाघ, सम्यक खडसे, कार्तिक फाटे, कुंदन सूळ, आकाश गोतमारे, घनश्याम धादोड, देवानंद खंडारे, प्रशिक गवई व सूरज मानकर आदी तरुणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. शिबिर यशस्वी करण्यासाठी स्वप्नील चोरे, हितेश शेळके, प्रथमेश भगत व नितीन बंगळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## उत्तमसऱ्यात वृद्धावर काठीहल्ला

**अमरावती –** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उत्तमसरा येथील सामुदायिक मंदिरात किसन शामराव कांबळे (73) यांचा मुलगा बसलेला होता. मुलाला घरी नेण्यासाठी किसन कांबळे यांनी हाक मारली असता, कोणतेही कारण नसताना मंगेश ठाकूर व अविनाश आरके यांनी त्यांच्यावर काठ्यांनी मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून बुधवारी बडनेरा पोलिसांनी दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# विनयभंग प्रकरणी आरोपीस तीन महिने सश्रम कारावास

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.9 ) –** महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी मोर्शी न्यायालयाने आरोपीस तीन महिने सश्रम मजुरी व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास अतिरिक्त तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. ही शिक्षा प्रथम श्रेणी न्यायाधीश एन. के. खराडे यांनी 7 जानेवारी रोजी ठोठावली.

विधी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावात बुद्ध विहाराजवळ 12 नोव्हेंबर 2019 रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास 21 वर्षीय तरुणी घरी जात असताना आरोपी मिलिंद गौतम ठाकरे (वय 30) याने तिचा हात ओढून विनयभंग केला होता. या घटनेची माहिती तरुणीने आई-वडिलांना दिल्यानंतर मोर्शी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलिसांनी आरोपीविरुद्ध भादंवि कलम 354 अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास पूर्ण केला. न्यायालयात आठ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. दोन्ही बाजूंनी युक्तीवाद ऐकल्यानंतर आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याने शिक्षा ठोठावण्यात आली. या प्रकरणाचा तपास एपीआय वर्षा खरसान यांनी केला, तर पैरवी अधिकारी म्हणून पोलीस हेड कॉन्स्टेबल अविनाश वाघमारे यांनी काम पाहिले.

# जिल्ह्यातील शेत पांदण रस्त्यांसाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.9 ) –** जिल्ह्यातील शेत पांदण रस्त्यांच्या विकासासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला असून यासाठी 5 कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हे रस्ते लोकसहभागातून विकसित केले जाणार असून, या कामासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

शेतकऱ्यांना शेतीपर्यंत जाण्यासाठी भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. शेत पांदण रस्ते लोकसहभाग आणि शासकीय निधीच्या संयुक्त माध्यमातून बांधण्यात येणार आहेत. यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून 5 कोटी देण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत प्रति किलोमीटर 9 लाख खर्च निश्चित करण्यात आला आहे. यापैकी 7.5 लाख निधी शासनाकडून, तर उर्वरित 1.5 लाख लोकसहभागातून उभारण्यात येणार आहेत. या योजनेचा पथदर्शी प्रकल्प अंजनगाव सुर्जी तालुक्यात राबविण्यात येणार आहे.



### 20 किलोमीटर लांबीचे पांदण रस्ते तयार

या तालुक्यात 20 किलोमीटर लांबीचे पांदण रस्ते तयार करण्यात येणार असून, उर्वरित सहा तालुक्यांत प्रत्येकी 5 किलोमीटर प्रमाणे एकूण 30 किलोमीटर पांदण रस्ते विकसित केले जाणार आहेत. या कामासाठी ‘लोकजागर’ या स्वयंसेवी संस्थेची निवड करण्यात आली आहे. या योजनेमुळे शेत रस्त्यांवरील अतिक्रमणे दूर होऊन शेतकऱ्यांचा शेतीमाल बाजारपेठेपर्यंत नेणे अधिक सुलभ होणार आहे. तसेच शेतरस्ते मोकळे करणे आणि जल पुनर्भरण साधणे हा या प्रकल्पाचा महत्त्वाचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात बारमाही शेत रस्ते तयार करण्यात येणार असून, पांदण रस्त्यांसाठी 5 किलोमीटरच्या आतील नदी व नाल्यांमधील गाळ व साहित्याचा वापर करण्यात येणार आहे. हे साहित्य स्वयंसेवी संस्थांना मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामुळे जलस्त्रोतांचे खोलीकरण होऊन भूजल पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

# सलग तिसऱ्या वर्षी दहिगाव धावडे जि.प. शाळेने पटकविले चॅम्पियन शिल्ड

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.9 ) –** चांदूर रेल्वे पंचायत समिती अंतर्गत जळका पाटाचे येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुका क्रीडा स्पर्धेत दहिगाव धावडे जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले. प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही गटांमध्ये सांघिक तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेने सलग तिसऱ्या वर्षी चॅम्पियन शिल्ड पटकावली.



क्रीडा क्षेत्रापुरतेच नव्हे, तर शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांमध्येही शाळेने आपला ठसा उमटवला आहे. प्रधानमंत्री शालेय पोषण शक्ती परसबाग, विविध सहशालेय उपक्रम, एमएनएनएस परीक्षा, जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा तसेच शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचा लौकिक वाढवत आहेत. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी विजय सगने, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर वैद्य, सरपंच पवन धावडे, पालकवर्ग तसेच कवठा कडू केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी मुख्याध्यापक प्रल्हाद इंगोले व सहायक शिक्षक राजेंद्र खोडे, विशाल बेले, सारंग धामणकर, अजय दाभेराव यांचे अभिनंदन केले.

# परतवाडा-अचलपूर शहरात वाहतुकीचा बोजवारा

## शहर चौक रामभरोसे, वाहतूक पोलीस नाक्यांवरच सक्रिय







**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.9 )–** परतवाडा-अचलपूर जुळे शहर हे लोकसंख्येच्या दृष्टीने अमरावती जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर असताना, येथील वाहतूक व्यवस्था मात्र पूर्णत: कोलमडलेली असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. स्वतंत्र वाहतूक पोलीस विभाग अस्तित्वात असूनही शहरातील प्रमुख वर्दळीच्या ठिकाणी एकही वाहतूक पोलीस प्रत्यक्षात दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### नागरिकांची ठोस मागणी

शहरातील सिग्नल यंत्रणा निष्क्रिय, पार्किंगची व्यवस्था नाही आणि अतिक्रमण वाढलेले आहे. अशा स्थितीत प्रमुख चौकांवर नियमित वाहतूक पोलीस नेमून, बाजारपेठ व शाळा-महाविद्यालयांच्या वेळेत विशेष नियोजन करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा अपघात व वाहतूक कोंडीची समस्या आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

जयस्तंभ चौक, गुजरी बाजार, अंजनगाव स्टॉप, विदर्भ मिल स्टॉप, पोस्ट ऑफिस चौक व बसस्थानक परिसर हे शहरातील अत्यंत गर्दीचे आणि अपघातप्रवण भाग मानले जातात. या ठिकाणी दुचाकी, चारचाकी, ऑटो रिक्षा, हातगाड्या व पादचाऱ्यांची मोठी गर्दी असते. परिणामी, वारंवार वाहतूक कोंडी, वादविवाद व किरकोळ अपघात घडत आहेत. मात्र या ठिकाणी वाहतूक नियंत्रणाऐवजी पोलीस कर्मचारी शहराबाहेरील रस्त्यांवर नाकाबंदी करताना दिसतात.

### नाक्यांवर तपासणी, शहरात अराजक

परतवाडा-चिखलदरा, परतवाडा-धारणी, अंजनगावकडे जाणारे रस्ते तसेच ग्रामीण भागाकडे जाणाऱ्या मार्गांवर वाहतूक पोलीस वाहनांची कागदपत्रे तपासणे व दंडात्मक कारवाई करण्यात अधिक व्यस्त असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतूक पूर्णत: रामभरोसे झाल्याची भावना आहे.

### शेतकऱ्यांचा वाढता रोष

परतवाडा-अचलपूर शहरात आजूबाजूच्या सुमारे पन्नास गावांतील विद्यार्थी, कर्मचारी, व्यापारी व नागरिक दररोज ये-जा करतात. विशेषत: मेळघाटातील दुर्गम भागातून येणारे आदिवासी शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी शहरात येतात. मात्र नाक्यांवर अनावश्यक अडवणूक व दंडाच्या नावाखाली त्रास दिला जात असल्याचा आरोप काही शेतकऱ्यांनी केला आहे.

# सरपंच लीला कुमरे यांच्या हस्ते पत्रकारांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड,( दि.9 ) –** मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त जामगाव ग्रामपंचायतीच्या वतीने पत्रकार सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात वरूड तालुक्यातील दैनिक महासागरचे प्रतिनिधी विलास पाटील यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या सरपंच लीला कुमरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन हा गौरव करण्यात आला.



कार्यक्रमात बोलताना सरपंच लीला कुमरे म्हणाल्या की, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार समाजातील वास्तव, समस्या व जनतेचे प्रश्न निर्भीडपणे मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. अशा पत्रकारांचा सन्मान होणे आवश्यक आहे. विलास पाटील यांनी ग्रामीण व शहरी भागातील जनतेचे प्रश्न, शेतकरी समस्या, सामाजिक विषय तसेच प्रशासनातील त्रुटींवर सातत्याने लेखन करून समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना पाटील यांनी ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे आभार मानले. कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

RNINO-46975/1985 | Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

